नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपेकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री विदर्भ साहित्य संघ

विदर्भ विषयः सारस्वती जन्मभूः

जानेवारी १९६१

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

★

या अंकातील लेखक व कवि

पु. य. देशपांडे

प्रा. नारायणशास्त्री द्रविड

श्री. गोदामासुत

नी. र. वऱ्हाडपांडे

केशव बोबडे

मधुकर राजेश्वर जोशी

ललित सोनोने

मूल्य ५० नये पैसे

युगवाणी

संपादक: [पु.] य. देशपांडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयाकरिता मान्य झालेले)

युगवाणी

जानेवारी १९६१

संपादक–मंडळ
संपादक पु. य. देशपांडे
सदस्य प्र. वा. ऊर्ध्वरेषे
पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

लेख

अस्तित्ववाद आणि त्याचे प्रवर्तक––पु. य. देशपांडे

दृष्टि, व्यवहार व विश्व––प्रा. नारायणशास्त्री द्रविड

रामक्रीडेचे रहस्य––श्री. गोदामासुत

अनामिकाची चिंतनिका––पु. य. देशपांडे

कविता

आवाहन––नी. र. वऱ्हाडपांडे

पांगुळगाडा––केशव वोबडे

अवघे अंबर––मधुकर राजेश्वर जोशी

साक्षात्कार––ललित सोनोने

याशिवाय संघवार्ता, वाङ्मयवार्ता वगैरे

★ ★ ★

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

युगवाणी

वर्ष १५] [अंक ९

कला : जीवन : समीक्षा संस्कृति

जानेवारी १९६१

●

अधिकाधिक समृद्ध जीवन म्हणजे अधिकाधिक जिव्हाळ्याची एकात्मकता.

अधिकाधिक सुजाणपण म्हणजेच अधिकाधिक सम्यक्-दर्शन. अशा सम्यक्-दर्शनाशिवाय एकात्मकतेचा विकास असंभव आहे.

या विराट् विश्वात अधिकाधिक व नित्य नवे असे काहीतरी पाहण्यासारखे सदैव उपलब्ध असते. म्हणून जीवसृष्टीचा विकास म्हणजे अधिकाधिक सूक्ष्म व समर्थ अशा नवदृष्टीचा विकास.

पहा, नाहीतर महाप्रलयात बुडून नामशेष व्हा—असा, या विश्वरचनेच्या मुळाशी असलेल्या प्राकृतिक महाशक्तीचा, तिच्या-कडूनच वरदान म्हणून प्राप्त झालेल्या, मानवी जीवनाला आदेश आहे.

["The Phenomenon of Man"–
By : Pierre Teilhard De Chardin.]

●

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

आ वा ह न

नी. र. वऱ्हाडपांडे

१

तोड या शृङ्खला, सोड भीतीस या
फोडुनी टाक रे दास्यदुर्गास या
खङ्गल्या का जुन्या गंजल्या शृङ्खला
दुर्गही सर्वथा जीर्ण हा जाहला

२

या तुझ्या गांजल्या अन्तरी वावरे
दिव्य सामर्थ्य, ज्या काळही घाबरे
जी अणूंच्यामधे झाकली राहते
शक्ति ती जागता विश्व ही जाळिते

३

बन्धनें तोडुनी ये खुल्या अंगणी
मुक्त वायूत या खेळ रात्रंदिनी
टाक त्या कल्पना, कुन्द वायूतल्या
अन्धकारातल्या बन्दिशाळेतल्या

४

मुक्तता हीच या जीवना प्रेरणा
मुक्तता हीच या सृष्टिची चेतना
वन्हिचे तेज हो, वायुचा वेगही
पूर्ण पुष्पातले मुग्ध सौन्दर्य ही

५

मुक्ततेने पुरे भारिले जे क्षण
कालसिन्धूत या ते खरे जीवन
जी युगे कंठिली मुक्ततेवाचुनी
मृत्यु तो वेगळा कोणता त्याहुनी ?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रासक्रीडेचे रहस्य

लेखकः– श्री. गोदामासुत

रासक्रीडेबद्दल बरेच दिवस मी विचार करीत होतो. त्यातील श्रीकृष्णाचे वेणूवरील अनंगवर्धक गीत, गोपींचे चारित्र्य भ्रष्टतेचे वर्णन, स्ववीर्यनिरोध करून घेतलेल्या भोगात पूर्णानंदाचा व एकत्वाचा गोपींना अनुभव, व गोपांना गोपी सतत जवळ असल्याचा अनुभव, या चार गोष्टीमुळे रासक्रीडेबद्दल माझे मनात विचार येत. काही निमित्ताने एकाशी याबाबत बोलण्याचा प्रसंग आला व पुढे असे वाटू लागले की एकदा हे विचार कागदावर घालावे. शेवटी आज ते लिहून काढीत आहे. अर्थातच ह्या विचारांचे माझ्या मनात–बुद्धीस, माझा तसा काही अधिकार नसताना, आकलन झाले, हे मातोश्रींच्या, सती गोदावरी उपासनीबाबा महाराज यांच्या कृपेमुळे. मला या आकलनाने समाधान वाटते, मग ते कितपत योग्य असेल ते असो.

श्री उपासनी बाबा महाराजांचा उपदेश

बाबांनी (सद्गुरू उपासनीबाबा महाराज) निक्षून सांगितले आहे की, कोणत्याही मनात आलेला कोणताही विचार–ऊर्मि–वासना कधीही नाहीशी होत नसून ती पिकत पिकत शेवटी योग्यवेळी साकार होते. हा विचार–ही वासना चैतन्याच्या अधिष्ठानावर उठत असल्याने तिला जीवत्व येते. (शुद्ध आत्म्याभोवती आलेले वासनारूप कवच म्हणजेच ज्याला आपण साधारणतः जीव म्हणून म्हणतो तो, म्हणजे अशुद्ध जीव, कारण शुद्ध जीव वासनारहित शिव होय.) हे जीवत्व मनुष्यरूपातच येईल असे नाही, तर वासनानुसार योग्य अशा कोणत्याही आकारात येऊ शकते. कोणतीही वासना म्हटली की तिच्या पूर्तीसाठी क्रिया केली जाऊन तिचा परिणाम म्हणजे अव्यक्त असे पाप–पुण्य बनते व ते योग्यवेळी शत्रु–मित्र भावनास आणि/किंवा जगातील सुखदुःख देणाऱ्या विषय वस्तूंच्या आकारास येते. म्हणजे थोडक्यात कोणतीही वासना व तदर्थ कर्म केल्यास त्यापासूनचे पाप–पुण्य हे सर्व साकारत्व पावतात.

ऋषींचे उर्वरित कर्म

पूर्वकालीन ऋषींचेकडे पहा. त्यांना आत्मानुभवाची इच्छा उत्पन्न झाली.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तदर्थ त्यांनी त्यांना योग्य वाटली तशी कर्मे केली, ते आत्मानुभव पावले–मुक्त झाले– ब्रह्मरूप झाले– म्हणजे त्यांचे जीवत्व नष्ट झाले. पण त्यांच्या त्या वासना व तत्पूर्तीकरता त्यांनी केलेल्या कर्मांचे पाप–पुण्यरूप परिणाम हे जगातले असल्याने येथेच–जगातच राहिले, व या सर्वांना योग्यवेळी साकारता आली. ते वासनारूप जीवत्व आजचे शास्त्रज्ञ असून त्यांची पाप–पुण्ये ही या शास्त्रज्ञांच्या शोधांचे परिणाम होत. विविक्षित काळातील ऋषींच्या त्या वासना व त्यांची पाप–पुण्ये योग्य अशावेळी, म्हणजे विविक्षित काळात, साकार होतात व यामुळे आपणास विविक्षित संस्कृति–सुधारणा एखाद्या लाटेप्रमाणे सर्वत्र जोराने पसरताना दिसते. गतानुगतिकत्व हा एक विचित्र गुण सजीव जीवांचेमधे दिसून येतो. आज एकाने हॉटेल उघडले की थोड्याच दिवसात पुष्कळजण हॉटेल उघडतात–हॉटेलांची लाट पसरते. संस्कृतीच्या लाटेचे सुद्धा मूळ कारण हे गतानुगतिकत्व होय. वासनांची पूर्ति झाली म्हणजे काही शिल्लत रहात नाही; म्हणजे हा वासनारूप जीव एका जन्मात–फार तर दोन–तीन जन्मात–(हे जन्म त्याचे पाप–पुण्याचे साठ्यावर अवलंबून राहातात)–खर्ची पडून शिल्लक काही राहात नाही. म्हणजे पर्यायाने हे जीव संपले म्हणजे त्यांचेमुळे आलेली संस्कृतीची लाट विराम पावते–विरून जाते–ती संस्कृति नष्ट होते. आजपर्यंत कित्येक संस्कृति अशा नाहीशा झाल्याचे इतिहास सांगतो, त्याची ही संगति होय. म्हणूनच आजच्या डोळे दिपवून टाकणाऱ्या पाश्चिमात्य संस्कृतिबद्दल बाबा एकदा म्हणाले, "आजची ही सुधारणा नाना शोध लावून भौतिक जीवनात कच्चे सुख निर्माण करीत राहील, कदाचित् दुसऱ्या ग्रहांवर सुद्धा जाऊन पोहोचू शकेल, पण ती जगरीतीची. त्या ऋषींचे ते वासनारूप जीव खर्ची पडले की, ही आजची संस्कृति विलयास जाईल. हे जीव केवळ वासनारूप असल्याने सूर्यभेदन करून बाहेर पडू शकत नाहीत–ब्रह्मरूप होऊ शकत नाहीत; ज्या जीवांच्या ह्या वासना होत, ते मागेच सूर्यभेदन करून ब्रह्मरूप होऊन गेलेले आहेत. म्हणून त्यांच्या ह्या वासनांची पूर्ति झाली की त्यांचे साकारत्व नष्ट होईल–बाकी काही राहाणार नाही." आता आपला देश ही कर्मभूमि असल्याने ते वासनारूप जीव, त्यांची कर्मगत पाप–पुण्ये व त्यापासूनची सुखदुःखे, ही सर्व भोगण्यास ते जीव या कर्मभूमिबाहेरच राहून उपभोग घेऊ शकतात. कर्मभूमि भोगभूमि होऊ शकत नाही. नाना तऱ्हेने शिक्षणाचे प्रयत्न होऊनही या देशात त्या तऱ्हेचे शास्त्रज्ञ होताना दिसत नाहीत, याची ही संगति होय.

तपाचे माहात्म्य

ब्रह्मदेव जन्मास आल्यावर आपण कोण, काय, वगैरे जाणण्याची त्यास इच्छा झाली. त्यावेळी तो एकटा एकच असल्याने व काय करावे हे त्याचे ध्यानी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येईनासे झाल्याने शेवटी नभोवाणीने त्यास " तप कर " असा उपदेश दिला. पौराणिक काळात याची उदाहरणे म्हणजे अर्जुन व उद्धव होत; श्रीकृष्णांनी त्यांना अनुक्रमे गीतेचे १८ वे अध्यायात व भागवतातील ११ स्कंधातील ७ व्या अध्यायात " त्या ईश्वरास शरण जा; बद्रिकाश्रमात जाऊन तप कर " असे सांगितले. सध्याच्या ऐतिहासिक कालात याचेच उदाहरण म्हणजे पांडुरंगांनी नामदेवास खेचर बोवास शरण जाण्यास सांगितले. (खेचर म्हणजे जो आकाशात –पोकळीत–काही नाही या अवस्थेत संचरत राहतो तो.) म्हणजे कर्तुमकर्तुम-न्यथाकर्तुं अशा शक्तियुत शुद्ध सात्विक आकाराशी पूर्णपणे एकतानता होऊनही भागत नाही; या पलीकडे जावे लागते–मूळ द्वंद्वाच्या–सत् व असत् यांचे पलीकडे जावे लागते. यात, आकारात असताना सत् व असत् असे म्हणणे भाग होते, व म्हणूनच भगवंतांनी ' सदसच्चाहमर्जुन ' असे म्हटले आहे; परंतु अपरोक्ष रीतीने द्वैत मांडायचे झाल्यास–जसे ऋग्वेदातील नासदीय सूक्तात सांगितले तसे म्हणजे–प्रथम असत् व मग सत् म्हणावे लागते. म्हणजे असत्चा पूर्ण अनुभव येऊन ते नाहीसे केल्याशिवाय, म्हणजे पर्यायाने तद्रूप झाल्याशिवाय, सत्ची समज येऊ शकत नाही. बाबांनी नाना प्रवचनातून नाना रीतीनी हेच मूळ समजावून सांगितलेले आहे. गेल्या शतकातील याचे उदाहरण म्हणजे श्रीमत् तोतापुरींनी रामकृष्णांना कालीची मूर्ति ज्ञानरूप तरवारीने नाहीशी करण्यास सांगितली, व हे सतत तीन दिवसांच्या परिश्रमाने रामकृष्णांना साध्य झाल्याबरोबर, म्हणजे तेच असत्रूप झाल्याबरोबर सत्रूपात डुबून गेले. " नाही हे आहेचा नाश करीत जाता जाता शेवटी एकटेच राहाते तेव्हा ते ' नाही ' ' आहेरूप ' होऊन जाते– ' नाही ' आहे होते, आहे असते," हे जे बाबा अट्टाहासाने सांगतात ते हेच. म्हणजे -नाम–रूपाचे पलीकडे गेल्याशिवाय मूळ हाती येत नाही म्हणतात ते हेच. होय अर्थातच हे असे म्हणावे लागते कारण ते मूळ शब्दातीत असल्याने त्या संबंधी खरी–पूर्ण–कल्पना शब्द देऊ शकत नाहीत–ते अपुरे पडतात–लंगडे पडतात.

काही उदाहरणे

या मार्गातील प्रगतीच्या पहिल्या टप्प्याचे उदाहरण म्हणजे नामदेवाने पांडुरंगास नैवेद्य खायला लावले हे होय. पूजाविधिचे हे सार होय. आपण दगड बनल्याशिवाय–जड बनल्याशिवाय–आपले चैतन्य मूर्तीत घालता येत नाही, असे जे बाबा म्हणतात ते हेच. ही प्रगति अर्थातच आकारास धरून होते. ब्रह्मदेवास नभोवाणीचा उपदेश, अर्जुन व उद्धवास श्रीकृष्णाचा उपदेश, व नामदेवास पांडुरंगाचा उपदेश, याच पायरीचे निदर्शक होत. ' तत्वमसि ' व 'अहंब्रह्मास्मि ' ही दोन महावाक्ये या प्रगतीची निदर्शक होत. यापुढे जायचे म्हणजे निराकाराचा अनुभव घ्यावयाचा व त्याकरता बाबांनी फार उत्तम उदाहरणे दिलेली आहेत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाणी निराकाररूप धरले तर गार ही पाण्याचे साकार रूप होय, व या आकारास पुन्हा मूळ रूपात जाणे असेल तर काहीतरी पाण्याचा–हवेतील वाफेचा–संसर्ग झाल्याशिवाय ती परत पाण्यांत रूपांतरित होऊ शकत नाही; याच दृष्टीने आरशाचे किंवा स्वच्छ विनरंगी पारर्शक बाटलीचे त्यांनी उदाहरण दिले आहे. म्हणजे 'अहंब्रह्मास्मि' या महावाक्यापुढे आता 'सर्वंखल्विदं ब्रह्म' या महावाक्याचा अनुभव घ्यावयाचा. मूर्ति जर चैतन्यरूप तर देहही पण चैतन्यरूपच होय; जगातील यच्चावत् सर्व सजीव व निर्जीव वस्तु चैतन्यरूपच होत; म्हणजे चैतन्याचे दृष्टीने सर्व वस्तु एकाच पातळीत येतात–असतात. याचे उत्तम ऐतिहासिक उदाहरण म्हणजे भिंतीसह ज्ञानोबा चांगदेवास सामोरे गेले हे होय. (याबाबत आता लेखी पुरावा उपलब्ध झाला असल्याने शंका उरलेली नाही.) अशा या प्रगतीमुळेच सत्पुरुष एकाच वेळी निरनिराळ्या ठिकाणी योग्य अशा साकाररूपात राहू शकतो–दिसू शकतो; असा पुष्कळांना अनुभव पण आलेला आहे.

रासक्रीडेची पार्श्वभूमि

असे हे सर्व मुद्दे ध्यानांत घेऊन रासक्रीडेकडे पाहिले म्हणजे रासक्रीडेचे रहस्य उमगू लागते. श्रीकृष्णावतारापूर्वी समाज त्रस्त होऊन गेला होता. व या त्रासापासून एक परमेश्वरच आता सोडवू शकेल, असा विचार सर्वांचे मनात ठाम होऊन गेला होता.–पृथ्वीसुद्धा हवालदील झालेली होती. असा सर्वत्र ठाम झालेला सजीव व निर्जीव जीवांचा विचार एकत्रित होऊन योग्यवेळी घनीभावास आला, तोच श्रीकृष्णाचा अवतार होय. दहाजण तांदूळ निवडायला बसल्यावर त्या सर्वांनी निवडलेले तांदूळ एकत्र करतात, हे बाबांनी दिलेले उदाहरण अवताराचीच, तत्पूर्वीच्या पार्श्वभूमीची संगती दाखवते. याच मुद्यास धरून 'व्यापकत्वात् विष्णुः' या व्युत्पत्तीस धरून, श्रीकृष्ण विष्णूचा अंशात्मक अवतार होय म्हणून वर्णिले आहे. याच तत्वावर "धर्मसंस्थापनार्थाय संभवामि" असे भगवंतांनी म्हटलेले आहे. ज्या काळात सर्वत्र त्रस्त असे लोक होते, त्याचवेळी त्यांचेमधे आध्यात्मिक मार्गात बराच पल्ला गाठलेले लोक पण होते. हे लोक या अवताराचे वेळी आपल्यापुढील प्रगतीकरता, प्रारब्धरहित अवस्थेत– स्त्री अवस्थेत–गोपींच्या आकारात देव–देवांदिकांच्या अंशरूपाने अवतरलेल्या गोपांच्या बायका म्हणून जन्मास आले. रासक्रीडेतल्या गोपी म्हणजे काही गोकुळातल्या सर्व बायका नव्हत्या. यशोदा, रोहिणी, वगैरे कितीतरी बायका होत्या, ज्यांना रासक्रीडेची शेवटपर्यंत काहीही माहिती नव्हती; जशी यांना माहिती नव्हती तशीच गोकुळातील पुरुष मंडळीस तसेच ज्यांच्या बायका रासक्रीडेस गेल्या त्या गोपांनाही माहिती नव्हती. रासक्रीडेच्या पूर्वीचे व नंतरचे अध्याय जरा नीट वाचले तर चटकन् ध्यानात येते की कृष्णाचा किंचित् काळ जरी पत्ता नसला तर नंद,–यशोदा सबंध गोकुळात कोलाहल

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माजवीत; म्हणजे सात वर्षांचा कृष्ण रात्र रात्र असा सतत दोन महिने घराबाहेर कधीच गेला नाही, हे ध्यानात येते; तो त्या सर्व रात्री यशोदेजवळच होता, त्या काळीच काय पण अजूनही या वयाची मुले आईच्या कुशीत निजतात. असो.

गोपी म्हणजे कोण ?

रासक्रीडेतल्या गोपींचे आकारात आलेले लोक 'सर्वंखल्विदं ब्रह्म' या महावाक्याच्या अनुभवाच्या अनुसंधानात होते–त्या अवस्थेच्या स्थितीत जाण्याच्या योग्यतेचे होते–तयारीत होते. कोणच्याही सत्पुरुषाचे चरित्र नीट पाहिल्यास चटकन् ध्यानात येते की, स्त्री–अवस्था स्थिर झाल्याशिवाय–मग त्याचा पुरुषाचा आकार असो की स्त्रीचा असो–कोणीही सत् अवस्थेत जाऊ शकत नाही; हे ध्यानात घेतले म्हणजे गोपींचे आकारात हे लोक का आले, त्याची संगति लागते. भगवंताच्या आकाराचा आरशाप्रमाणे किंवा पाण्याच्या वाफेप्रमाणे या गोपींना उपयोग होत होता–होणार होता असे म्हणा पाहिजेल तर. तेव्हा भगवंताचा आकार जसजसा रूपात येत गेला–स्वतंत्र कार्यकारी होऊ लागला, तसतसे त्या आकाराचे आंदोलन यांचे वर होऊ लागले, व त्यामुळे त्यांच्या वासना–भावना म्हणा–त्यांचेपासून अलग होण्याच्या परिस्थितीत येऊ लागल्या, व एक दिवस त्या सर्व एकत्रित होऊन साकार झाल्या–रासक्रीडेचा कृष्ण बनला; यशोदेच्या कृष्णाच्या आकारामुळे, त्याच्या अधिष्ठानावर, हा एकत्रित वासनांचा बनला. हा आकार बनल्याबरोबर तो वेणूवर (बांबू पोकळ असतो व त्यापासून केवळ नाद उत्पन्न होतो) अनंगवर्धक गीत, म्हणजे अंगरहित अवस्थेत, देहातीत अवस्थेत, आकाररहित अवस्थेत नेणारे गीत गाऊ लागला–नाद घुमवू लागला. साहाजिकच त्या अवस्थेत जाण्याची तयारी असलेल्या त्या गोपींना ते गीत–तो नाद ऐकू आल्याबरोबर त्यांचे देहावसान अर्धवट सुटून त्या, त्या नादाकडे, त्या निराकाररूप आकाराकडे, जाण्यास सर्व कामे सोडून धाऊ लागल्या. त्यांच्यातही ते गीत ऐकू आल्याबरोबर ज्या अशा चटकन् अलग होऊ शकल्या नाहीत–ज्यांची तितकी तयारी नव्हती, म्हणजे आकाररहित अवस्थेशी साकार अवस्थेचा संपर्क ठेवू शकत नव्हत्या, त्यांचे देहावधान पूर्णपणे सुटून त्या जड समाधि अवस्थेत गेल्या–त्यांचे जीव देहापासून अलग होऊन गेले–जगदृष्टीने त्या गतप्राण झाल्या. त्या नादस्वराबरोबर गोपी धावल्या त्यावेळी त्यांच्या नातेवाइकांनी त्यास हटकले. या हटकण्याचा, म्हणजे त्यांच्या विरुद्ध स्वरूपाच्या आंदोलनाचा परिणाम म्हणजे निराकार अवस्थेच्या अनुसंधानात असलेल्या त्या जीवांचे देह चेंडूस दिलेल्या गतिप्रमाणे जरी पुढे गेले, तरी ते आकारात आलेले त्या हटकण्याच्या प्रतिक्रियेमुळे थोडचा वेळाने परत घराकडे आले व त्यांच्या या वासनात्मक भावना अलग होऊन कृष्णाजवळ राहिल्या. भागवतात सुरवातीस जरी गोपी नातेवाइकांच्या हटकण्यामुळे परतल्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे स्पष्टपणे म्हटलेले नाही, तरी शेवटी स्पष्टपणे म्हटले आहे की, गोपांना आपआपल्या गोपी सतत निकट असल्याचा अनुभव होता व त्यामुळे ते कधी मत्सरग्रस्त झाले नाहीत. म्हणजेच त्या गोपी गोपांच्या गोपी म्हणून हटकण्यामुळे लगेच परतल्या असल्या पाहिजेत हे ध्यानी यते.

नादलुब्ध गोपींची अवस्था

त्या जशा नादलुब्ध होऊन धावू लागल्या त्यावेळी, आपण एकटेच असे जात नाही आहोत, हे सुद्धा त्यांचे ध्यानात आले नाही. प्रत्येकीस आपण एकटेच आहोत असे वाटत होते—अजून सर्वत्रावधान त्यांना जमले नव्हते. त्या पोहोचेपर्यंत हे अवधान काहीसे त्यांना जमले, त्यामूळे गोपींच्या मेळचात असलेला एकमेव कृष्ण प्रत्येकीस दिसू लागला. ज्या आकाराच्या आंदोलनामुळे हे झाले तो दिसू लागल्याबरोबर त्या आनंदाने, वैयक्तिक आनंदाने, बेहोष होऊन गेल्या—'मी'पणाची जाणीव डोकावली; त्यावरोबर धावण्याच्या वेळच्या हटकलेल्या वाक्यांचे स्मरण पण झाले असले पाहिजे, कारण की त्याची प्रतिक्रिया म्हणून त्या निराकाररूप कृष्णाच्या आकाराने त्यांना परत जाण्याचा उपदेश केला, त्यावरोबर त्यांच्या वासना त्या कृष्णाकाराच्या अधिष्ठानावर साकार होऊन मूळ आकार घरोघर लगेच परतले, व हे साकारत्व पावलेले आकार त्या मूळ आकाराशी समरस होऊ लागले. परंतु मीपणाची झळक पुरेशी नाहीशी न झाल्यामुळे व तिच्या स्वाभाविक प्रभावामुळे आपल्या एकत्रित कृष्णाचा आकार त्यांस दिसेनासा झाला—कृष्ण अंतर्धान पावले. हे झाल्याबरोबर त्या हदरून गेल्या. त्यांची चूक त्यांचे ध्यानांत आली, परंतु त्या पाहिलेल्या आकाराचा पगडा बसलेला नाहीसा न झाल्यामुळे त्यांचे मनात किंचित् विकृति उत्पन्न होऊन, कृष्ण कोणा एकीस बरोबर घेऊन निघून गेला असे त्यांना वाटू लागले. मीपणा पूर्ण नाहीसा झाल्याशिवाय आत्मानुभव नाही, हेच त्या अंतर्धान होण्याचे रहस्य होय. मीपणा पूर्ण शरणागतीशिवाय जात नाही व सर्वत्र समता बाणल्याशिवाय शरणागति पूर्ण होत नाही. भावनेची अतीव उत्कटता झाल्याशिवाय काही साध्य होत नाही व विरहाशिवाय, भावना पूर्णपणे उत्कट होत नाही, या तत्वाप्रमाणे कृष्णाकार नाहीसा झाला व गोपी विरहसागरात डुबल्या. परंतु त्यांची प्रगति उच्चावस्थेत पोहोचलेली असल्याने त्यांनी विरहावस्थेचा फायदा घेऊन तद्रूपता व समता यांच्या आविष्कारार्थ त्या भिडल्या. योग्य प्रमाणात हा आविष्कार झाल्याबरोबर त्या 'एका गोपीची' व त्यांची गाठ पडून, स्वतःप्रमाणेच झालेली तिची अवस्था पाहून, त्या चटकन् आपली चूक उमगल्या व सर्वजणी शरणागत झाल्या. शरणागति शिघेस गेल्यावरोबर कृष्ण त्यांचेसमोर उभा असलेला त्यांना दिसू लागला. त्या आकाराशी त्या आता तद्रूप होऊ लागल्या व ही तद्रूपता वैयक्तिक रीत्या पूर्ण झाल्यावरोवर त्यांच्या त्या भावनेने वैयक्तिक असा कृष्णाचा आकार घेतला,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व त्याचा परिणाम म्हणजे जितक्या गोपी तितके कृष्ण दिसू लागले, व रासक्रीडेचा अभिनव अद्वितीय असा खेळ सुरू झाला.

रहस्याचा उलगडा

गोपाची जी गोपी, तीच कृष्णाकारास कारणीभूत झालेली, तीच स्वतः देहापासून अलग होऊन रासक्रीडेस आलेली, तीच वैयक्तिक कृष्ण बनून रासक्रीडेत भाग घेणारी होय; म्हणजेच या रासक्रीडेच्या गोपी या सत्पुरुष अवस्थेतील उच्च पातळीवर–भूमिकेवर अधिष्ठित झालेल्या होत्या हे ध्यानी येते.

आणि म्हणूनच बोलता बोलता एकदा सहज मातोश्री बोलून गेल्या की, कृष्ण बनणे सोपे आहे पण गोपी बनणे कठिण आहे ? म्हणूनच अशा या गोपींना उद्धवाने साष्टांग नमस्कार घातला. म्हणूनच शुकाचार्यासारखा नैष्ठिक बाल–ब्रह्मचारी रासक्रीडेशी समरस होण्यात स्वानंद मानू लागला, व या रासक्रीडेचे वाचन–विचार श्रद्धायुक्त अंतःकरणाने करणारा लौकरच वासनामुक्त होऊन त्यास परा भक्ति प्राप्त होईल, असा त्याने आशीर्वाद दिला.

असे हे विवेचन पूर्ण ध्यानात ठेवून रासक्रीडेचे अध्याय वाचू लागले म्हणजे प्रत्येक श्लोक, प्रत्येक ओवी ही काही निराळाच आनंद उत्पन्न करते आहे, असे ध्यानी रुजते.

टीप–श्री बाबांचे ग्रंथ मिळण्याचे ठिकाण–मॅनेजर, उपासनी संस्थान;– साकोरी; पोस्ट राहाता; जिल्हा अहमदनगर; महाराष्ट्र.

★ ★ ★

साक्षात्कार

विश्वातल्या पोकळीत
तुझा नेटका संसार
अचेतन चेतनाचा
तूच एक शिल्पकार.

मातीच्या ह्या बाहुलीत
तुझी बोलकी किमया
ब्रह्मालाहि मुठीमधे
झाकण्याची आदिमाया.

साऱ्या सृष्टीत असाच
तुझा दिव्य चमत्कार
कणाकणात पाहतो
रोज नवा साक्षात्कार !

––ललित सोनोने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनामिकाची चिंतनिका

एक वैचारिक आत्मकथा] [भाग ४ था

१

आधुनिक विज्ञानाने माझ्या मनावर फार खोलवर परिणाम केलेला आहे. या विज्ञानाने भौतिक जगाचे सुबुद्ध मानवास जे 'दर्शन' घडविले आहे ते इतके आकर्षक, विशाल व विस्मयजनक आहे, की, त्याच्या तुलनेत बाकी सारे काही निष्प्रभ होऊन बसले आहे. भारतीय आध्यात्मिक दृष्टीचे जे संस्कार माझ्या मनावर बालपणापासून आनुवंशिकतेने व परंपरेने झाले होते व ज्या संस्कारांनी माझा मानसिक पिंड पोसला गेला, त्या संस्कारांना आधुनिक विज्ञानाने एकेकाळी चांगलाच हादरा दिला.–

माणसाचे मन संस्कारांवरच पोसले जात असते. जसे संस्कार तसे मन, असा नियम गृहीत धरणे भागच पडते. पण हे संस्कार अदृश्य व अतिसूक्ष्म असल्यामुळे त्यांच्या संख्येचे व गुणधर्मांचे गणिती निदान करता येणे अशक्यप्राय होते. प्रत्येक मानवी व्यक्ति हे एक गूढ व न सुटणारे कोडे बनते, ते याचमुळे.–

उदाहरणार्थ, माझ्या मनावर माझ्या जन्मदिनापासून किती संस्कार झाले याची मला मोजदाद करता येणे शक्य नाही. कारण प्रत्येक संस्काराची नोंद माझ्या मानस–कोषावर झालेली असली तरी तिचे हुकमी स्मरण मला करता येत नाही. आधुनिक मानसशास्त्र सांगते की, प्रत्येक व्यक्तीला जे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तित्व प्राप्त होते त्याची घडण त्या व्यक्तीच्या पहिल्या दोन–तीन वर्षांतच घडली जाते. आणि पहिल्या दोन तीन वर्षांतील अनुभवांची स्मृति कोणाला असते? निदान मला तरी माझ्या आयुष्यातील पहिल्या दोन–तीन वर्षांत काय घडले, कोणत्या घटनांनी माझ्यावर कोणते व किती खोलवर परिणाम केले व त्यामुळे माझ्या स्वभावाला व आवडी–निवडींना कसे वळण लावले, हे सांगता येणे शक्य नाही.

● लेखक :– पुरुषोत्तम यशवंत देशपांडे ●

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि हे झाले माझ्या या जन्मापुरते. भारतीय तत्वज्ञानानुसार पुनर्जन्म मानला तर प्रत्येक व्यक्ति अनेक भूतपूर्व जन्मांचे संस्कार घेऊनच पुनः—पुन्हा जन्मास येत असते, असे मानावे लागते. आणि वर्तमान जन्मातील व्यक्तित्वाची घडण घडविणारे बालपणीचे संस्कारच जेथे विस्मृत होतात तेथे भूतपूर्व अनेक जन्मोजन्मीच्या संस्कारांबद्दल काय बोलता येणार ?

सारांश, आपण ज्याला 'मी' म्हणतो, 'मी' म्हणून जी एक विशिष्ट व्यक्ति आपण आहोत असे मानतो, तो 'मी' वर्तमान आयुष्यातील अनेक अज्ञात संस्कारांनी घडविला गेला आहे, एवढेच नव्हे, तर अनेक पूर्व जन्मांच्याहि संस्कारांनी घडविला गेला असण्याचा संभव आहे. त्यामुळे, आणि हे सर्व संस्कार विस्मृतीच्या काळोखात गडप होऊन बसल्यामुळे, आपल्या प्रत्येकातील 'मी' आपल्यांलाच अज्ञात होऊन बसला आहे. जेथे सर्वस्वी आपला आणि अत्यंत निकटवर्ती व प्रत्यक्ष अनुभवाचे मूलाधिष्ठान असलेला 'मी'च आपल्याला अज्ञात, तिथे इतर माणसांच्या स्वभावाबद्दल, ती वा तो कसा आहे, काय आहे याबद्दल, आपल्याला कोणतेहि निश्चयात्मक विधान करता येणे शक्य तरी आहे का ?—

आणि तरीहि आपण आपल्यांविषयी व इतरांविषयी वाटेल ती ठाम मते ठोकून देत असतो, वाटेल ते बरे—वाईट ग्रह करून घेत असतो एवढेच नव्हे, तर या मतांनुसार व पूर्वग्रहानुसार आपले सारे जीवन सुखी वा दुःखी बनवून टाकीत असतो !—

आपल्या समग्र जीवनाची उभारणी केवळ अज्ञानावरच झालेली असते, याची जाणीव प्रत्येकाला जेव्हा होईल आणि या जाणिवेनुसार केवळ विशुद्ध जिज्ञासेवर व सहज जिज्ञासापूर्तीमुळे प्राप्त झालेल्या निश्चित ज्ञानावर मानवी जीवनाची जेव्हा उभारणी केली जाईल तेव्हाच मानवी जीवनाला काही अर्थ प्राप्त होईल. तोवर सारे अज्ञात, अनिश्चित, संघर्षमय आणि अर्थशून्य.—

● ● ●

हे सर्व स्पष्टपणे मानवी इतिहासात कोणी प्रथम ओळखले असेल तर ते वेदकालीन भारतीय ऋषि—मुनींनी. वेदांताने केवळ एकाच प्रश्नावर आपल्या सर्व जीवन दर्शनाची उभारणी केली आहे. तो प्रश्न म्हणजे '**मी कोण ?**'—

आणि या एकाच प्रश्नाचा सूक्ष्मतम विचार करून, त्या विचारानुसार जीवनाला प्रत्यक्ष वळण लावून, निश्चित अनुभवांचे एकच एक सूत्र हाती घेऊन वैदिकांनी अखिल ब्रह्मांडाचा वेध घेतला. 'मी' आणि 'ते', 'अहम्' आणि 'इदम्', 'आत्मा' आणि 'ब्रह्म' अशा आदि द्वंद्वापासून आपल्या संशोधनाला

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आरंभ करून, हे द्वंद्वच कसे आभासात्मक आहे, मायावी आहे, मिथ्या आहे, आणि **'सर्व खल्विदं ब्रह्म', 'सत्यं ज्ञानमनंतम् ब्रह्म', 'तत्वमसि'**—हेच कसे अंतिम व निर्णायक सत्य आहे, हे त्यांनी तर्क व साक्षात्कार या उभयविध प्रकारांनी सिद्ध करून दाखविले—

प्रत्येक व्यक्ति म्हणजे प्रत्येक जीवात्म्यावर झालेले संस्कार-साकल्य. हे संस्कार-साकल्य कर्मामुळे म्हणजे अविद्येमुळे व्यक्तिमात्रात आकारास येते आणि केवळ यथार्थ ज्ञानामुळेच त्याचा निरास केला जाऊ शकतो; कर्मजन्य संस्कार-साकल्यच 'व्यक्ति तितक्या प्रकृति' आकारास आणते; परंतु 'पिंडीं तें ब्रह्मांडीं' असा ज्ञानमय साक्षात्कार होताच सर्व कर्मबंध शिथिल होतात, गळून पडतात, प्रकाश-किरणामुळे काळोख जसा नाहीसा होतो तसे नाहीसे होऊन जातात. आणि मग जीवात्म्याला खऱ्या मुक्तीचा चिरंतन ब्रह्मानंद प्राप्त होतो.—

वेदांताचे हे आत्मविज्ञान अनेक शास्त्रांचे जनक ठरले. भारतीय जीवनदर्शनाचे भव्योदात्त वैशिष्टच वैदिक षट्दर्शनांनी आकारास आणले आणि अनेकविध आध्यात्मिक पंथांनी व शास्त्रांनी त्याला पुष्ट केले. या भारतीय जीवनदर्शनाने मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगांवर एक नवा प्रकाश पाडला. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक असे अखिल सृष्टीचे वैचारिक वर्गीकरण करून, दैवी संपत्ति व आसुरी संपत्ति यांच्या अनाद्यनंत संघर्षाचे यथार्थ व विराट् रूप मानवी मनासमोर त्यांनी उभे करून दाखविले.—

परंतु मानव हा एक अत्यंत विसरभोळा प्राणी आहे. तो क्षणकाल जाणतो, इच्छा करतो, कृति करतो आणि पुन्हा सारे विसरून जातो. आणि म्हणून पुन: पुन्हा जाणणे, इच्छा करणे, कृति करणे यांची परंपरा वर्षानुवर्ष, जन्मानुजन्म चालू राहते. हेच मानवी जीवनाचे 'रहाटगाडगे' होय. अविद्या, माया, अज्ञान यांचे काळोखी आवरण यथार्थ ज्ञानप्रकाशाने कायमचे दूर सारले जाई-पर्यंत हे रहाटगाडगे असेच चालू राहणार. धनुष्य-बाण आणि भाले-तलवारी यांच्या ऐवजी अण्वस्त्रे व परमाणु-स्फोटके आली म्हणजे 'प्रगति' झाली, असे आपण मानतो. परंतु बाण काय, अथवा अण्वस्त्रे काय, ही सर्व, यथार्थ ज्ञानाभावी, आसुरी संपत्तीचीच आयुधे ठरतात. माया वा अविधा यांच्या पोटी जन्मास आलेली ही आयुधे मानवाला अधिकाधिक अंधारात, 'घोरतम' काळोखात नेणारीच ठरली आहेत. ज्ञान-पूर्ण प्रगतीचा प्रकाश दाखविण्यास ती सर्वथैव असमर्थ ठरली आहेत.

वेदांताची, आत्मज्ञान-विज्ञानाची विस्मृति, हेच भारतीयांच्या अवनतीचे एकमात्र कारण आहे, असे मला आता अधिकाधिक उत्कटतेने वाटू लागले आहे. आणि म्हणूनच की काय, आधुनिक विज्ञानाने माझ्या संस्कार-साकल्याला जो हादरा दिला होता, तो आता बराच ओसरू लागला आहे; तरी पण आत्मसाक्षा-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्कारापासून मी अद्याप किती तरी दूर असल्यामुळे, भौतिकानुगामी आधुनिक विज्ञान आणि आत्मज्ञानानुगामी पुरातन वेदांतविद्या, यांचा संघर्ष माझ्या मनाच्या रणांगणावर अद्याप चालूच आहे.

२

मी कोण ?,–माझे खरे स्वरूप कोणते ?–माझ्या जीवनाला काही अर्थ आहे का ? मी जे जे जाणिले, वांछिले, केले, ते का ? कशा करता ? मी कोठून आलो व मला कुठे जावयाचे आहे ?–या प्रश्नांची निश्चित उत्तरे शोधण्यासाठी मी आता धडपडत आहे.–

–माझ्या जीवनाचा, कांहीसा अंधुक, काहीसा प्रकाशित, चित्रपट माझ्या नजरेसमोर उभा राहतो. पण किती थोडा वेळ ! माझ्या जीवनाच्या चित्रपटाला कसलेच स्थैर्य असलेले मला दिसून येत नाही. कदाचित् त्याला, स्थैर्य असेलहि; परंतु माझी दृष्टिच अति अस्थिर, अति चंचल असल्यामुळे ती या चित्रपटातील कोणत्याहि चित्रावर माझे लक्ष फार वेळ टिकू देत नाही.–

मला जे जाणून घ्यावयाचे आहे त्यासाठी मला आधी माझी दृष्टि, माझे लक्ष स्थिर करावे लागेल. माझे लक्ष फुलपाखरासारखे या फुलावरून त्या फुलावर सारखे उडत असते. जीवनाच्या बागेतील अनेकविध फुलांचा मधुगंध क्षणकाल चाखला न चाखला तोंच पुन्हा फडफड सुरू होते. आणि ही फडफड व धडपड करता करताच फुलपाखरू पानाफुलांच्या पाचोळ्यासारखे गळून पडते, गतप्राण होते आणि मातीत मिळून जाते.–

'लक्ष'–सारे काही लक्षातच साठलेले असावे. लक्ष्यसंधान साधल्याशिवाय 'मी' आणि 'माझे जीवन' यांचा वेध घेता येणे अशक्य आहे.–

लक्ष्यसंधान साधण्यासाठी मी अनेक युक्त्याप्रयुक्त्या करून पाहत आहे. पैकी एका युक्तीने मला थोडीफार साथ दिली असावी, असे वाटते.–

–भारतीय नैय्यायिकांनी ज्ञानाची मोठी सुटसुटीत व्याख्या केलेली आहे. ज्ञान म्हणजे अनुभव आणि स्मरण. आणि हे ज्ञान दोन प्रकारचें असू शकते. एक यथार्थ व दुसरे अयथार्थ. आपल्याला जे ज्ञान होते, ते यथार्थ की अयथार्थ, याची कसोटी प्रमाणाने पहावी लागते. भारतीय नैय्यायिकांनी या प्रमाण शास्त्राचा इतका सूक्ष्म व खोलवर विचार केलेला आहे की, हे शास्त्र जर आधुनिक बुद्धिवादी अभ्यासितील तर त्यांच्या मनावरील किती तरी जळमटे त्यामुळे साफ धुवून निघतील, अनेक वैचारिक गोंधळांचा गुंताळा त्यामुळे उकलला जाईल व अस्सल ज्ञानसाधना म्हणजे काय, याचा लख्ख प्रकाश त्यांच्या डोक्यात पडेल..

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

—वेदांताची शास्त्र म्हणून जी उभारणी झालेली आहे ती न्यायशास्त्राच्या बैठकीवरच. फरक एवढाच की, नैय्यायिक व सांख्यादि इतर दार्शनिक 'द्वैती' आहेत आणि वेदांती 'अद्वैती' आहेत. पण हा फरक, न्याय शास्त्राचे अंतिम टोक गाठल्याशिवाय, यथार्थतेने आकलन केल्या जाण्यासारखा नाही.—

वेदांती 'स्वतः प्रामाण्यवादी' आहेत, तर नैय्यायिक 'परतः प्रामाण्यवादी' आहेत. आणि या दोन अर्थगंभीर दर्शनांतील हा वाद सरतेशेवटी व्यक्तीला आपापल्या प्रकृत्यनुसार व प्रवृत्यनुसार स्वतःच सोडवावा लागतो.—

मला वाटते सामान्यतः प्रत्येक माणूस स्वभावतःच स्वतः प्रामाण्यवादी असतो. माणसाला क्षणोक्षणी जे ज्ञान होत असते व जे खरे आहे असे तो मानतो. म्हणजे त्या ज्ञानाचे प्रामाण्य त्याला जे पटते, ते अनुमानाने नव्हे तर त्याच्या स्वतःच्या ज्ञानेंद्रियांवर त्याचा स्वभावतःच विश्वास असतो म्हणून. जे जे ज्ञान त्याला होत असते ते खरे आहे, यथार्थ आहे, असे स्वतः प्रामाण्यावर विसंबूनच, तो गृहीत धरीत असतो. आणि जोवर त्याने जे स्वतःवर विसंबून प्रमाण मानले, ते अयथार्थ आहे असे सिद्ध केले जात नाही, तोवर त्याचे ज्ञान त्याला यथार्थच वाटत राहते. निर्विवाद अनुमान—प्रमाणाने वा अन्य प्रमाणाने त्याचे हे ज्ञान जेव्हा अयथार्थ ठरते तेव्हाच तो पूर्वी गृहीत धरलेल्या ज्ञानाविषयी भ्रमनिरसित होतो. याचा अर्थ एवढाच की, केवळ अप्रामाण्यच अनुमानप्रमाणाने गृहीत होते. प्रामाण्यासाठी अनुमानप्रमाणाची सामान्यतः आवश्यकता नसते. सारांश, प्रामाण्य हे स्वतः सिद्धच असते. प्रामाण्याचा जेव्हा संशय निर्माण होतो, तेव्हांच अनुमानाने त्याचे निराकरण केले जाते. आणि अशा संशयनिवृत्तीनंतर पूर्वीचे प्रत्यक्ष ज्ञान खरे ठरते अथवा खोटे ठरते. खरे ठरल्यास अनुमानाने केवळ पूर्वीचे ज्ञानच सिद्ध होते. आणि खोटे ठरल्यास त्यातील केवळ अप्रामाण्यच सिद्ध होते. म्हणून अनुमानाने केवळ अप्रामाण्यच कळते. प्रामाण्य हे सदैव स्वतः सिद्धच असते.—

● ● ●

आधुनिक मानव, आणि विशेषतः बुद्धिवादी अथवा बुद्धिजीवी आधुनिक मानव, हा अनंत संशयांनी पछाडला गेलेला प्राणी आहे. इतका की, संशयवाद हाच मानवी बुद्धिमत्तेचा कळस होय, असा समज आधुनिक जगावर आता चांगलाच प्रस्थापित झाला आहे; एवढेच नव्हे, तर तो प्रतिष्ठाहि पावू लागला आहे. सर्व श्रद्धांचे, सर्व निष्ठांचे अधिष्ठान संशयित करून टाकणे, हीच आधुनिक बुद्धिवाद्यांची खरी करामत आहे. आधुनिक विज्ञानाच्या प्रभावामुळे व बिस्मयजनक यशामुळेच बहुतांश बुद्धिवाद्यांचा असा बुद्धिभेद झालेला आहे.—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आधुनिक विज्ञानाची ही भयानक करामत माणसाला केवळ संशयात्मा बनवू पाहत आहे. सर्व काही अनिश्चित व संशयमय; संशयातीत असे जगात व जीवनात काहीच नाही.—बहुतांश आधुनिक विचारवंतांचे 'तत्त्वज्ञान' या अशा सर्वव्यापी संशयावर अधिष्ठित झाले आहे. आणि म्हणून आधुनिक विचारवंतांना व कलावंतांना प्रस्थापित श्रद्धांचा व निष्ठांचा मर्मभेद करणं, यांतच आपल्या नवनवोन्मेषशालि प्रतिभेचे खरे सार्थक आहे, असे वाटू लागले आहे.—

ज्या प्रस्थापित श्रद्धांचा व निष्ठांचा भेद केला जाऊ शकतो, म्हणजे ज्या श्रद्धांना व निष्ठांना बूडच नाही, भक्कम अधिष्ठानच नाही, त्यांच्याविषयी संशय निर्माण करून त्या नष्ट करून टाकणे हे योग्यच आहे, असे मलाहि वाटत आलें आहे. निर्बुद्ध कर्मठपणा, निर्बुद्ध भक्ति–भावना, निर्बुद्ध चालीरीति, रूढी व अंधश्रद्धा यांच्यावर आधुनिक वैज्ञानिकांनी, विचारवंतांनी व कलावंतांनी जो हल्ला चढविला तो अर्थपूर्णच होता, असे मानणाऱ्यांपैकी मी एक आहे. या कामी मी देखील माझी वाणी व लेखणी बरीच झिजविलेली आहे. आणि याबद्दल मला यत्किंचित्‌हि पश्चात्ताप होत नाही.—

परंतु मी आणि इतर अनेक आधुनिक, यांच्या याबाबतच्या करामतीत बराच फरक असला पाहिजे. गतानुगतिकत्वाला व जुन्या निर्बुद्ध निष्ठांना माझा जो विरोध होता व आहे, त्याची मूळ प्रेरणा माझ्यातील दुर्दमनीय सत्य–संशोधक वृत्तीत असावी, असे मला वाटतें. सत्याचा शोध,—आपल्या अनुभवाशी इमान राखून केलेला सत्याचा शोध,—मला हवा होता व आहे. त्यासाठीच मी माझ्या जीवाचे आजवर रान केले आहे. जे अंतकरणाला पटले व अनुभवांच्या आशयाशी सुसंगत वाटले, ते इतरांना पटविण्यासाठी व त्याला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठीच माझी सारी धडपड होती. या धडपडीने माझ्यात अनेक वैचारिक परिवर्तने घडवून आणली. ईश्वर–भक्तिवादापासून निरीश्वर नास्तिक-वादापर्यंत, पाश्चात्य उदारमतवादापासून मार्क्सप्रणीत साम्यवादापर्यंत आणि साम्यवादापासून तो नव्या मानवतावादापर्यंत, माझ्या वैचारिकांची जी जीव जाळणारी उलथापालथ झाली, ती केवळ आपल्या अनुभवांशी इमान राखून अंतिम सत्याचे दर्शन घडावे यासाठीच. सर्व जुन्या निष्ठांचा व श्रद्धांचा केवळ विध्वंस करण्यात मला कधीच स्वारस्य वाटले नाही. भावनोत्कट, बुद्धिप्रधान व अनुभव-निष्ठ अशा नव्या दर्शनाचे जे आभास मला घडले, पण जे आभास नसून सत्य-दर्शन आहे असे मला वाटले, त्यांच्या प्रस्थापनेसाठी व प्रतिष्ठेसाठीच मी जुन्या निष्ठांचा व श्रद्धांचा आजवर बेमुर्वतपणे विरोध केला. या विरोधामुळेच, मला वाटते, जीवनसंघर्षाच्या उग्रतम व विराट् स्वरूपाचे मला दर्शन घडू शकले.—

पण आज माझी जी वैचारिक दुर्दशा झालेली आहे तिच्या मुळाशी एक निराळीच तीव्र वेदना आहे. ईश्वर, भक्तिवाद, नास्तिकवाद, उदारमतवाद

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साम्यवाद आणि नवमानवतावाद यांपैकी प्रत्येकाशी, त्या त्या वेळेपुरते, माझ्या मनाचे व जीवनाचे उत्कट तादात्म्य झाले होते. आणि एकातून दुसऱ्यात परिवर्तन होत असता, या तादाम्याचा जो अपरिहार्यपणे भंग होत होता त्यामुळे माझ्या अंतःकरणातील कितीतरी जीवबंध तटातट तुटले; त्यामुळे झालेल्या वेदना मार्क्स-प्रणीत साम्यवादाचे तादात्म्य तुटेपर्यंत मोठ्या धैर्याने मी सहन केल्या. पण मार्क्सवादाचे पाश तोडताना झालेल्या वेदना इतक्या तीव्र होत्या की, त्यामुळे माझ्या बुद्धिवादी जीवाला झालेल्या जखमा अद्याप ओल्याच राहिल्या आहेत.—— आणि आता माझ्या मनासमोर जो प्रश्न उभा राहतो तो असा की, निष्ठा, श्रद्धा, बुद्धिनिष्ठ ठाम मते व विचारप्रणाल्या यांना काही अर्थ तरी आहे का ? मला ज्या ज्या वेळी जे जे उत्कटपणे वाटले व माझ्या बुद्धीला पटले त्या त्या वादाशी वा विचारप्रणालीशी मी उत्कटत्वाने तादात्म्य पावलो. इतका की, त्याच वादात व त्याच विचारप्रणालीत सर्व मानवी समस्यांचे अंतिम उत्तर साठले आहे, असे मला प्रत्येक वेळी उत्कटत्वाने वाटले. आणि आता, या सर्व वादांची व विचार-प्रणाल्यांची माझ्या समोर पडलेली प्रेते मी जेव्हा पाहतो, तेव्हा ही आपलीच प्रेते आहेत, अशी भयानक प्रतीति मला येते ! मी माझ्या आयुष्यात अशा रीतीने चार पाच वेळा तरी मेलो आहे, ठार झालो आहे. आणि माझी ही इतकी प्रेते मला नित्य दिसत असता, त्यांच्या कुजण्याचा दुर्गंध माझ्या जीवाला बेचैन करीत असता, मी जेव्हा माझ्या बाकी उरलेल्या जीवाकडे पाहतो तेव्हा, हे देखील प्रेतच तर नाही ना, अशी विदारक शंका माझ्या मनात वारंवार डोकावते.——

प्रेत, प्रेत–सर्वत्र प्रेतेच प्रेते. असंख्य प्रेते निर्माण करणें, हेच जीव-नाचें कार्य !

मृत आशांची राख लेवुनी,
मृत इच्छांचा साज चढवुनी,
मृत हृदयांच्या माळा घालुनी,
अमर मृत्यूचे निशाण मिरवी–
मरणाची राणी——

३

प्राचीन भारतीयांनी पृथ्वीला 'मृत्युलोक' असे जे नाव दिले ते अगदी यथार्थ आहे. या भूतलावर जो जो जीव जन्माला येतो तो तो अखेर मृत्युमुखीं पडतो. मृत्यूइतकी निश्चित वस्तु या मृत्युलोकात दुसरी कोणती आहे ?

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जन्माची व्याख्याच मुळी मृत्यूच्या साहाय्याने करावी लागते. ज्याचा मृत्यूत अंत होतो तोच जन्म मृत्यूला आपल्या बरोबर घेऊनच प्रत्येक जीव या लोकात जन्माला येत असतो. आणि दुर्विलास हा की, मृत्यूला विस्मरूनच तो आपले जीवन जगत असतो.——

मृत्यु हा ठरलेलाच असल्यामुळे त्याच्याविषयी जास्त विचार करण्याची जरूरच काय ? जीवांत जीव आहे तोवर शक्य तितक्या आनंदाने जीवन जगावे, एवढेच निसर्गाने, नियतीने वा ईश्वराने आपल्याला दिले आहे.——

हा विचार आकर्षक असला तरी विचारी माणसाचे विचारचक्र तेथेच थांबू शकत नाही. जन्माच्या अलीकडे आणि मृत्यूच्या पलीकडे काय असावे, हा विचार मनात डोकावल्याशिवाय राहत नाही. आणि या विचारामुळे उदयास येणाऱ्या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळाल्याशिवाय मानवी विचाराची व जिज्ञासेची पूर्तता होऊ शकत नाही.

—आधुनिक विज्ञान अनेक गोष्टींवर चांगला प्रकाश पाडते. पण जन्म आणि मृत्यू यांच्या रहस्यावर प्रकाश पाडण्यास ते अद्याप असमर्थच ठरत आहे. जन्माच्या अलीकडे आणि मृत्यूच्या पलीकडे काहीच नाही, असले तरी ते कळणे शक्यच नाही, अशीच आधुनिक भौतिक शास्त्रांची भूमिका आहे. ही भूमिका अपुरी आहे, असे मला वारंवार वाटत आले आहे. जन्म आणि मृत्यू या दोन टोकांतच माझे जीवन साठले असेल, माझ्या मी—त्वाला माझ्या वर्तमान जन्मापूर्वी अस्तित्वच नव्हते आणि मृत्यूनंतरहि त्याला अस्तित्व राहणार नाही. हे जर खरे असेल, तर कोणत्याहि चिरंतन मानवी जीवनमूल्यांची भाषाच मला अथवा इतरांना बोलता येणार नाही. कारण या भाषेला काही अर्थच उरणार नाही.

जन्म—मृत्यूचे कोडें न उलगडणे, ते उलगडण्याच्या आवश्यकतेकडेहि दुर्लक्ष करणे, या वृत्तीतच वर्तमान काळातील सर्व वैचारिक गोंधळांचे मूळ दडले असावे, असे मला आता वाटू लागले आहे. माझ्या जन्माच्या अलीकडे माझे असे कांहीच नव्हते आणि माझ्या मृत्यूच्या पलीकडे माझे असे काहीच बाकी उरणार नाही, असे एकदा ठामपणे गृहीत धरले आणि जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या परिमित कालावधीतील घटनांची संगति लावण्याचा मी प्रयत्न करू लागलो की, जीवनाला काही अधिष्ठान आहे, जीवनाला काही अर्थ आहे, याची प्रतीति येणे मला तरी अशक्य होऊन बसते.—

मी जन्माला का आलो, हे मला कधीच कळणार नसेल आणि मृत्यू मला निश्चितपणे येणार आणि तो माझा कायमचा अंत करणार, हे जर ठरलेलेच असेल, तर वर्तमान जीवन नीतीने, सदाचाराने, तत्वनिष्ठेने, ध्येयवादित्वाने, मांगल्याने, सौंदर्याने, घालविण्याचे मला कारणच काय ? मला हे सर्व अथवा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांपैकी काही, सुखाचे, आनंदाचे वाटले, तरच मी त्यासाठी धडपडेन. परंतु माझे सुख केवळ माझ्यावरच अवलंबून नाही; अनेक व्यक्तींच्या विविधतापूर्ण सुसंवादित्वावर आणि बाह्य परिस्थितीच्या अनुकूलतेवर ते अवलंबून आहे, हे मला किंवा इतर कुणालाही सहज कळून येते. या दोन्ही गोष्टींवर कोणत्याहि व्यक्तीचे निश्चित नियंत्रण असंभवनीय आहे. सारांश, केवळ व्यक्तिनिष्ठ सुखवाद, हेदेखील माझ्या जीवनाचे अधिष्ठान होऊ शकत नाही.–

मी कोण, कुठून आलो, कुठे जाणार, हे मला कळावयाचे नाही, म्हणून 'मी' माझ्या जीवनाचे अधिष्ठान होऊ शकत नाही; आणि माझे सुख सर्वस्वी परावलंबी म्हणून तेहि माझ्या जीवनाचे अधिष्ठान होण्यास अपात्र. शिवाय, जे आज सुखदायक वाटते ते उद्या दुःखकारकहि होऊ शकते. आणि सुख वा दुःख ज्याला होते तो प्रत्येक व्यक्तीतील 'मी', त्या 'मी' चे यथार्थरूप मात्र सदैव अज्ञात!—अशा अवस्थेत 'मी' आणि 'माझे जीवन' या शब्दांना काय अर्थ उरतो ?

● ● ●

आधुनिक विज्ञान हे एक प्रकारचे ज्ञान आहे. कोणत्याहि ज्ञानाची यथार्थता प्रमाणानेच सिद्ध होत असते. आधुनिक विज्ञानाचे सिद्धांत हे मुख्यतः प्रयोग–प्रधान प्रमाणाने म्हणजे प्रत्यक्ष प्रमाणाने, आणि काहीसे अनुमान प्रमाणाने सिद्ध केले जातात. कोणतेहि ज्ञान होताच, ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान, अशी त्रिपुटी आकारास येत असते. आणि या तीन पदार्थांचे परस्पर संबंध कसे आहेत हे पाहणे, हे देखील ज्ञानप्रक्रियेचे महत्वाचे अंग असते, अथवा असावयास पाहिजे.

माझ्या ज्ञानेंद्रियांच्या द्वारे ज्ञान होणार मला. हे ज्ञान यथार्थ की अयथार्थ, हे पडताळून पाहण्याची इच्छा होणार मला. आणि यथार्थता वा अययथार्थता पटल्यानंतर ज्ञानानुसारी प्रवृत्ति वा निवृत्ति होणार तीहि मलाच. या सर्व ज्ञानप्रक्रियेत अत्यंत महत्वाचा व मूलभूत घटक जर कोणता असेल तर तो 'मी', अथवा 'ज्ञाता.' पण आधुनिक विज्ञान मला सांगते, "तू आपल्या 'मी' चा विचार मुळीच करू नकोस. माणसातल्या 'मी' या पदार्थाला काहीच अर्थ नाही. 'मी'– या पदार्थावर दृष्टि केंद्रित करणे म्हणजे, जगविन्मुख होणे, अंतर्मुख होऊन स्वगताच्या (Subjectivism च्या) अंधाऱ्या अंतराळांत अनंतकाल गटांगळ्या खात राहणे होय. त्यापासून काहीच निष्पन्न होणे शक्य नाही. बहिर्मुख दृष्टीने जगाकडे व जीवनाकडे पाहणे, जे दिसते, जे भासते त्याचे विश्लेषण करणे आणि तदंतर्भूत घटनांची तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ संगति लावण्याचा प्रयत्न करीत राहणे, एवढेच ज्ञान–प्रक्रियेचे कार्य आहे. या प्रक्रियेने जे हाती येईल त्याचा मग

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मानवी कल्याणाच्या वा अकल्याणाच्या दृष्टीने उपयोग करण्यास माणूस स्वतंत्र आहे.–

–'आधुनिक विज्ञानाने माणसाचे कल्याणाऐवजी अकल्याणच जास्त केले असेल, परमाणुस्फोटकादि प्रलयास्त्रे संशोधून मानवी जीवन धोक्यात आणले गेले असेल, तर त्यांचा दोष विज्ञान वा वैज्ञानिकांकडे नसून राज्यकर्ते व समाज नेते यांच्याचकडे आहे."–

वैज्ञानिकांची ही भाषा व ही बेजबाबदार वृत्ति मला भयानक वाटते. ती अशीच चालू दिली तर मानवी जगाचा सर्वनाश हा अटळच मानला पाहिजे.

–पण विनाश अथवा विकास ही ज्ञान–विज्ञानोपासकांच्या स्वाधीनची गोष्ट नाही असे क्षणभर गृहीत धरले, तरी ज्ञानप्रक्रियेच्या ज्ञाता–ज्ञेय–ज्ञान या त्रिपुटीतील मुख्य व मूलभूत घटक जो 'ज्ञाता' त्याच्या स्वरूपाकडे दुर्लक्ष करणे हे, केवळ विशुद्ध ज्ञानप्रक्रियेच्या दृष्टीने देखील, प्रमादशील नाही का ? ज्ञानप्रक्रियेतील 'ज्ञाता' या पदाकडे आधुनिक वैज्ञानिक जे दुर्लक्ष करतात ते मूलतःच ज्ञानविरोधी आहे. आणि म्हणून आधुनिक विज्ञान हे पूर्ण ज्ञान नसून अर्धवट ज्ञान आहे. आणि अर्धवट ज्ञान हे नेहमीच अत्यंत भयावह असते.–

● ● ●

माझ्या दृष्टीने, म्हणजेच सामान्य माणसाच्या दृष्टीने, आधुनिक विज्ञानाच्या निष्कर्षांकडे आणि त्यांनी घडवून आणलेल्या सामाजिक व जागतिक परिवर्तनाकडे मी जेव्हा पाहतो तेव्हा या विज्ञानाने सामान्य माणसाला व त्याच्या व्यक्तित्वाला कःपदार्थ बनवून टाकले आहे, अशी प्रतीति मला आल्याशिवाय राहत नाही. केवळ तज्ज्ञांच्या साहाय्याने चालणारी असंख्य, विविध व अजस्त्र यंत्रे आणि मानवताविन्मुख अशा सत्ताधाऱ्यांच्या हाती देण्यात आलेली परमाणुस्फोटकादि प्रलयास्त्रे, यांची आजवरची करामत व फलश्रुति पाहता, सामान्य माणसाने एकतर निमुटपणे यांची गुलामगिरी पत्करावी, नाही तर आत्महत्या करून स्वर्गाची वा नरकाची वाट धरावी, यापरता दुसरा मार्गच त्याच्या समोर उरलेला नाही.–

–मानवी कल्याणाची ध्येयवादी वा भूतदयावादी भाषा बाजूला सारून, केवळ विशुद्ध ज्ञानदृष्टचा आधुनिक विज्ञानाच्या निष्कर्षांकडे निरखून पाहिले, तरी माझ्यासारख्या सामान्य जिज्ञासूचे समाधान होत नाही. आणि मला असेहि दिसून आले आहे की, कित्येक आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या वैज्ञानिकांचे व विचारवंतांचेहि आधुनिक विज्ञानाच्या फलश्रुतीने समाधान झालेले नाही. हे विज्ञान

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्याला कुठे नेत आहे, याविषयी हे वैज्ञानिक व विचारवंत आता साशंक झालेले आहेत. आधुनिक विज्ञानात जवळ जवळ पूर्णतेस पोचलेले शास्त्र म्हणजे पदार्थविज्ञान (Physics). या शास्त्राबाबत एकीकडे जेम्स जीन्ससारखा महान् वैज्ञानिक म्हणतो की, भौतिक सृष्टीची रचना विशुद्ध गणिती स्वरूपाची आहे, असे दिसून येते. आणि म्हणून असा निष्कर्ष निघू शकतो की, सृष्टि ही गणिती तत्वानुसार बनविण्यात आली असली पाहिजे.'–यावर एडिंग्टनसारखा तितकाच महान् वैज्ञानिक विचारतो, "हे गणित आले कुठून ?–सृष्टीच्या रचनेत गणित जे दिसते ते आपण (मानवाने, ज्ञात्याने) तिथे टाकले आहे. आपण गणित मांडून सृष्टीकडे पाहिले नसते, तर तेथे आपल्याला गणित मुळीच दिसून आले नसते."–

● ● ●

सारांश, ज्ञात्यापेक्षा ज्ञेयाला सर्वश्रेष्ठ महत्व व प्राधान्य देऊन आधुनिक विज्ञानाने माणसाऐवजी वस्तूला, चैतन्याऐवजी जडाला, सार्वभौमत्व बहाल करून दिले आहे. आणि यामुळे ज्ञानप्रक्रियेच्या 'ज्ञाता–ज्ञेय–ज्ञान' या त्रिपुटीला 'विपरीत करणी' करावयास भाग पाडले आहे. हे करीत असता, ज्ञान हे ज्ञात्या-करताच उदयास येत असते, ज्ञात्याच्या स्वरूपावरच ज्ञेयाचे व ज्ञानाचे स्वरूप अवलंबून असते, ज्ञात्याच्या यथार्थ स्वरूपाकडे दुर्लक्ष करून ज्ञेय व ज्ञान यांची भाषा बोलणे म्हणजे 'डेन्मार्कच्या राजपुत्रावाचून हॅम्लेट या नाटकाचा प्रयोग करण्यासारखेच आहे',–या भूलभूत सत्याकडे आधुनिक विज्ञानाचे पार दुर्लक्ष झाले आहे.–

आधुनिक विज्ञानाबाबत मला हे सर्व सांगावेसे वाटले याचे कारण या विज्ञानाने माझ्या मनाला एकेकाळी इतके मोहून टाकले होते. की, वैज्ञानिक वा शास्त्रीय दृष्टि हीच खरी ज्ञानदृष्टि होय, ज्ञानसाधना म्हणजे दुसरे तिसरे काही नसून ती आधुनिकांनी प्रवर्तिलेली विज्ञानसाधनाच होय, आणि इतर सर्व प्रकारची ज्ञानसाधना, आध्यात्मिक ज्ञानसाधनादेखील, निव्वळ थोतांड होय, अशा वृत्तीच्या पूर्ण आहारी जाऊन मी माझ्या जीवनाची बरीच नासाडी करून घेतली आहे.–

–परंतु या विज्ञानाचे एक ऋण मला मान्य करणे भागच आहे. ते म्हणजे सापेक्षता व परमाणु–विज्ञान यांच्या अभ्यासामुळेच माझ्या मनावरील मार्क्स-वादाची मगरमिठी शिथिल झाली. आणि एका नव्या विमुक्त वृत्तीने मी मार्क्स वादाकडे व कम्युनिस्टांकडे बघू शकलो, त्यांच्या ज्ञानविज्ञानविरोधी तत्वज्ञानाचे अंतरंग यथार्थतेने जाणू शकलो. आधुनिक विज्ञानाचे हे ऋण मला कधीहि विसरता येण्यासारखे नाही.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विज्ञानाचे दुसरेहि एक ऋण मला मान्य केले पाहिजे. ते म्हणजे स्वतंत्र सत्यसंशोधक वृत्तीचे माहात्म्य. स्वातंत्र्याच्या जीवनमूल्याचे दर्शन आधुनिक विज्ञानाने जसे घडविले तसे ते इतर कोणत्याहि दर्शनाने मानवाला घडविले असेल, असे मला वाटत नाही.

आधुनिक विज्ञानाची ही अमोल देणगी बरोबर घेऊनच मी आता न्याय–वेदांतादि प्राचीन भारतीय दर्शनांकडे वळलो आहे. स्वतंत्र वृत्ति व विशुद्ध जिज्ञासा या दोन विज्ञानदत्त चक्षूंनी मी भारतीय षड्दर्शनांकडे पाहण्याचा व त्यांचे अंतरंग संशोधिण्याचा प्रयत्न करू लागलो आहे. आणि आज, माझ्या या शारीरिक दुर्दशेत, शांति व समाधान यांचे आशाकिरण मला कुठे दिसत असतील, तर ते वैदिक दर्शनांच्या आणि विशेषत: सांख्य–योग व वेदांत या दर्शनांच्या गाभ्यात.–

(क्रमश:)

* * *

अ भि प्रा य

सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सरोजिनी बाबर, पुणे यांनी दि. १. १२. ६० रोजी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. त्यावेळी वि. सा. संघाचे कार्याबद्दल त्यांनी व्यक्त केलेला अभिप्राय:–

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयास भेट देण्याचा योग आज घडून आला ही माझ्या जीवनातील एक भाग्याची गोष्ट आहे. इथल्या कार्यकर्त्यांशी व विशेषत: अध्यक्ष श्रीमान् शेंडेजी यांच्याशी झालेली वाङ्मयीन-चर्चा महत्वाची होती. इथले कार्यहि मला एकंदरीने अपूर्वाईचे वाटले. या साहित्य संघाची अशीच उल्लेखनीय प्रगति होवो.

१–१२–१९६० } **सरोजिनी बाबर**
संपादिका, समाज शिक्षण माला पुणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ यांजकडून

कार्यकारी मंडळाची सभा–

केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा दि. ४-१२-६० रोजी सकाळी ९–३० वा. संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली भरली. यावेळी पुढील निर्णय घेण्यात आले–

१. मागील सभेचा अहवाल मंजूर करण्यात आला.

२. वि. सा. संघाच्या घटनेतील नियमांप्रमाणे संमेलनाध्यक्षांची निवड करण्यास वणी येथील संमेलन कार्यकारिणीने स्पष्ट नकार कळविला असल्यामुळे व वणी येथे संमेलन घेण्यात येणार नाही, असे कळविल्यामुळे यंदाचे संमेलन वणी येथे न घेता दुसऱ्या ठिकाणी घेण्यात यावे असे ठरविण्यात आले.

३. आर्वी येथील वि. सा. संघाच्या शाखास्थापनेला मान्यता देण्यात आली.

४. "टागोर जन्मशताब्दि" संबंधी विचार होऊन पुरेसे आर्थिक साह्य मिळाल्यास फिरते रंगमंच बांधण्यात यावे व त्याला "टागोर रंगमंच" नाव देण्यात यावे, असे ठरले.

५. वि. सा. संघाचे शिष्टमंडळ मा. मुख्यमंत्री आणि मा. शिक्षणमंत्री यांचेकडे पाठवावे, असे ठरले.

वि. सा. सं. च्या शिष्टमंडळास मा. शिक्षणमंत्र्यांची भेट–

विदर्भ साहित्य संघातर्फे दि. २२-१२-६० ला सकाळी ९॥ वा. (१) अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, (२) श्री. अण्णासाहेब डबीर, वाशीम, (३) म. म. डॉ. मिराशी, (४) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आणि (५) कार्यवाह श्री. य. गो. माळोदे यांचे शिष्टमंडळ शिक्षणमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांना त्यांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निवासस्थानी भेटले. या भेटीच्यावेळी शिक्षण खात्याचे सचिव श्री. चिन्मुलगुंद हेहि उपस्थित होते.

शिष्टमंडळाने शिक्षणमंत्र्यांना (१) वि. सा. संघाच्या वाढत्या खर्चाच्या प्रमाणात त्याच्या वार्षिक अनुदानात वाढ करावी, (१) श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या बांधकामासाठी अनुदान द्यावे, (३) वाशीम आणि चांदा यांची नावे अनुक्रमे वत्सगुल्म आणि चन्द्रपूर अशी ठेवण्यात यावीत, (४) शुद्धलेखनाचा प्रश्न तज्ज्ञांची प्रातिनिधिक समिति नेमून सोडवावा, (५) रामटेक येथे कालिदासाचे स्मारक उभारावे, इत्यादि मागण्यांचे निवेदन सादर केले. त्यावर सुमारे १॥ तास चर्चा झाली; व शिष्टमंडळाचे म्हणणे श्री. बाळासाहेब देसाई यांनी सहानुभूतीने ऐकून घेऊन मागण्यांचा विचार अगत्यपूर्वक करण्याचे आश्वासन दिले.

भेटी व सत्कार

सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सरोजिनी बाबर, पुणे, यांनी दि: १-१२-१९६० रोजी वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी "लोकसाहित्य" या विषयावर उद्बोधक चर्चा झाली. ह्यावेळी डॉ. बाबर यांनी काही लोकगीते म्हणून दाखविली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यानी दि. १-१२-६० रोजी रात्री ८ वाजता भेट दिली.

महाराष्ट्र राज्याचे मंत्रि–मंडळ, विधान परिषद आणि विधान सभेचे अध्यक्ष आणि सर्वपक्षीय प्रमुख आमदार यांचा वि. सा. संघातर्फे सत्कार.

दि. ८-१२-१९६० रोजी सायंकाळी ६-३० वाजता विदर्भ साहित्य संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मंत्रि–मंडळ, विधान परिषद आणि विधान सभेचे अध्यक्ष आणि सर्वपक्षीय प्रमुख आमदार यांचा सत्कार करण्यात आला. सुरुवातीला माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण मुख्यमंत्री आणि इतर मंत्री व विधानपरिषद आणि विधानसभेचे अध्यक्ष अनुक्रमे श्री. स. वि. पागे व श्री. सयाजीराव सिलम यांना संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी संघकार्यालय आणि रंगमंदिर दाखविले. नंतर सर्वांना खास उमारण्यांत आलेल्या शामियान्यात अल्पोपहार देण्यात आला. त्यावेळी मा. मुख्यमंत्री यांनी प्रत्येकाच्या जागी जाऊन सर्वांचा खास परिचय करून घेतला. संघाध्यक्ष श्री. शेंडे यांनी पुष्पहार घालून सर्वांचा सत्कार केला आणि स्वागतपर भाषण केले. मा. मुख्यमंत्र्यांनी समारोपाचे भाषण केले. त्यावेळी त्यांनी "साहित्यिकांना मी मार्गदर्शन करू शकत नाही. उलट साहित्यिकांनीच शासनाला मार्गदर्शन करावे अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे.—विदर्भ साहित्य

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघाने जे महत्वाचे काम केले, ते भूषणावह आहे," असे उद्गार काढले. नंतर सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी सर्वांचे आभार मानल्यावर हा समारंभ संपला.

माननीयांची उपस्थिति— या समारंभासाठी मा. यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री, विधान परिषदेचे सभापति श्री. स. वि. पागे, विधानसभेचे अध्यक्ष श्री. सयाजीराव सिलम, बांधकाममंत्री श्री. मा. सा. कन्नमवार, राजस्वमंत्री श्री. वसंतराव नाईक, समाजकल्याणमंत्री डॉ. श्यं. रा. नरवणे, उपमंत्री श्री. जी. डी. पाटील, उपमंत्री श्री. मदनगोपाल अग्रवाल, उपमंत्री श्री. मधुसूदन वैराळे व डॉ. कैलाश; प्र. स. पक्षाचे नेते श्री. एस. एम. जोशी, जनसंघाचे श्री. रामभाऊ म्हाळगी, आमदार श्री. मनोहरभाई पटेल, डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. य. खु. देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. श्री. ना. बनहट्टी, श्री. पु. बा. काळे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. महेश्वर गद्रे, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. य. गो. मालोदे चिटणीस वि. सा. संघ, श्री. गो. स. देहाडराय, श्री. श्री. ग. पांढरीपांडे, सौ. सुमतिदेवी धनवटे, कु. ताराबाई प्रधान कोषाध्यक्ष आदि मंडळी उपस्थित होती.

दि. ९-१२-१९६० रोजी सायं. ६–३० वा. पुण्याचे संगीतज्ञ सरदार श्री. मुजुमदार यांनी वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत करण्यात आल्यावर चहापानाचा कार्यक्रम झाला. यावेळी संगीत शास्त्रावर उद्बोधक चर्चा झाली.

भोसला वेदशाळेच्या अमृतमहोत्सवाचे निमित्ताने दि. १८–१२–६० रोजी सर्वश्रेष्ठ राष्ट्रपति डॉ. राजेन्द्रप्रसाद यांचे वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात आगमन झाले असता वि. सा. संघाचे वतीने विश्वस्त लोकनायक डॉ. मा. श्री. अणे यांनी त्यांना पुष्पहार समर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली.

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

महाराष्ट्र राज्याच्या गॅझेटियर्स विभागाचे प्रमुख आणि थोर संशोधक श्री. सेतु माधवराव पगडी यांचे दि. २३–१२–६० रोजी सायं. ६–३० वाजता बुटी सभागृहात "पानिपतचा संग्राम" या विषयावर फारसी भाषेतील ऐतिहासिक साधनांच्या आधारे अतिशय उद्बोधक आणि वक्तृत्वपूर्ण भाषण झाले. यावेळी प्रा. भ. श्री. पंडित अध्यक्षस्थानी होते. पानिपतच्या संग्रामाचा इतिहास पुन्हा लिहिला जाण्याची आवश्यकता त्यांनी अभ्यासपूर्ण विवेचनाने प्रतिपादन केली.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(वत्सगुल्म) वाशीम,
झाल्याबद्दल वि. सा.

शाखावृत्त

गोंडवनशाखा चंद्रपूर ...ार्थ्यांना ...

महाराष्ट्राचे थोर मातृभ...नेते श्री. एस्. एम् जोशी यांचे दि. ११-१२-६० रोजी "साहित्य आणि समाजवाद...जजीवन" या विषयावर उद्बोधक व्याख्यान झाले.

संप...

खामगाव शा... खा---

खामग... व शाखेतर्फे आणि राष्ट्रभाषा प्रचार समितीतर्फे टिळक स्मारक मंदिरात दि. ५-१२-६० रोजी प्रसिद्ध रशियन लेखक आणि तत्वज्ञ काऊन्ट लिओ टॉल्स्टॉय यांची ५० वी पुण्यतिथि असि. जज्ज श्री. तळशीकर यांचे अध्यक्षतेखाली साजरी झाली. याप्रसंगी प्रा. जहागिरदार, प्रा. ऊर्ध्वरेषे, श्री. पंधे गुरुजी व अध्यक्ष श्री. तळशीकर यांची लिओ टॉलटॉय यांच्या जीवन व तत्वज्ञान यावर माहितीपूर्ण व्याख्याने झाली. टिळक राष्ट्रीय विद्यालयाच्या वाद्यवृंदाने सुरवातीला वाद्यवादन करून प्रसंगाला शोभा आणली.

दोन नाटयप्रयोग

खामगाव शाखेतर्फे दि. १२ व १३ डिसेंबर ६० रोजी गजानन टॉकीजमध्ये श्री. विद्याधर गोखले कृत "साक्षीदार" आणि आचार्य अत्रेकृत "कवडी चुंबक" या दोन नाटकांचे सुंदर प्रयोग सादर करण्यात आले. साक्षीदार नाटकात पुढील व्यक्तींनी कामे केली.

सौ. ऊषाताई उर्ध्वरेषे (मल्लिका), डॉ. बाबुराव पारसनीस (सहस्रबुद्धे वकील); प्रा. पद्माकर डावरे (मधुकर मोहिले), प्रा. बाळासाहेब तारे (महांबळ वकील), प्रा. ऊर्ध्वरेषे (जज्ज); प्रा. उपदेव (डॉ. विचारे), प्रा. जाजुर्ले (धुरंधर), श्री. विश्वासराव देशमुख (इन्स्पेक्टर सावंत), श्री. जोशी (कोर्ट कारकून), श्री. दिनकर जहागिरदार (गोपाळ). या सर्वांची कामे अतिशय सुंदर झाली.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"कवडी चुाचे काम केले, ते भूषणावह ळ व्यक्तींनी भूमिका केल्या--
ग. श्री. गो. काशीकर यांनी
डॉ. बाबुराव प।. ा. जाजुर्ले (चंदन), प्रा. उपदेव
(केशर) कु. ललिता गडकर. देशपांडे (कस्तुरी), श्री सखा-
रामपंत जोशी (मोहन), प्रा. समारंभासाठी मा. श्री. विनायकराव देशमुख
(जंगूशेठ), श्री दिनकर जहागिरदार स. वि. पागे, मनोहरपंत काळे (शास्त्री-
बुवा). या सर्वांनी अतिशय उत्कृष्ट कामे मा. सा. क

या दोन्हीहि नाटकांच्या उत्पन्नातून सर्व ख. नरजा जाता राहिलेली सातशे ते आठशे रुपयांची सर्व रक्कम विदर्भ साहित्य संघाच्या कोल्हटकर स्मारक निधी-साठी देण्यात येणार आहे.

साक्षीदार नाटकाचे लेखक श्री. विद्याधर गोखले यांनी विदर्भाशी असलेले संबंध लक्षात घेऊन प्रयोगमूल्याची रु. ३० ची रक्कम देणगी म्हणून वि. सा. संघाच्या खामगाव शाखेला दिली, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे.

भंडारा शाखा

दि. २०-१२-६० रोजी भंडारा शाखेतर्फे काव्यसंमेलनाचे आयोजन नामवंत कवि श्री. ना. डो. राहाटे, यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले. यात श्री. कृ. मु. उजळंबकर, श्री. मनोहर खापर्डे, कु. सुगंधा शेंडे, कु. पूर्णाबाई बोरकर, श्रीमती शालिनीबाई देवस्थळे आणि श्री. ना. डो. राहाटे या कवि-कवयित्रींनी भाग घेतला.

शाखेच्या सरचिटणीस कु. सुगंधा शेंडे यांनी सर्वांचे आभार मानले. पान-सुपारीनंतर हा कार्यक्रम संपला.

परीक्षा–समिति वृत्त

सर्व केंद्राधिकाऱ्यांना सूचना–

१. वि. सा. संघाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या मराठीच्या सर्व परीक्षा फेब्रुवारी ६१ च्या दुसऱ्या आठवड्यात होतील.

२. परीक्षार्थी आवेदनपत्रे भरून पाठविण्याची अंतिम तिथि दि. १० जानेवारी ६१ पर्यंत ठेवण्यात आली आहे.

३. केंद्राधिकाऱ्यांनी आवश्यक त्या परीक्षांची आवेदनपत्रे त्वरित मागवावीत.

नागपूर
दि. ३०-१२-६०

तु. वि. गेडाम
संचालक, परीक्षा समिति

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परीक्षाकेंद्र वृत्त

आराळा केंद्रः प्रमाणपत्र वितरण समारंभ–

आराळा येथील केंद्रातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण समारंभ दि. १७-१२-६० रोजी माध्यमिक विद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी श्री. वा. वि. सांगोळे यांचे हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांना उद्देशून येथील केंद्राधिकारी श्री. रा. ना. पांडे व श्री. भागवत यांनी "मातृभाषेच्या अभ्यासाचे महत्व" या विषयावर ओजस्वी भाषण झाले. नंतर कार्यवाह श्री. तराळे यांनी अहवाल वाचन केले. आभार प्रदर्शनानंतर हा कार्यक्रम संपला.

वाङ्मय--वार्ता

डॉ. नियोगी आणि काकासाहेब पुराणिक यांची चरित्रें—

"मी आपल्या प्रांतातील सुप्रसिद्ध विद्वान पुढारी डॉ. भवानीशंकर नियोगी आणि काकासाहेब पुराणिक या न्यायमूर्तिद्वयांची चरित्रे लिहिण्याचे कार्य हाती घेतले आहे. या थोर कार्यकर्त्यांनी व समाजसेवकांनीं राजकारण ,समाजकारण, विद्यापीठ, न्यायालय, नगरपालिका अणि इतर विविध संस्था यात निरनिराळ्या उच्च पदावर आधिष्ठित होऊन जी समाजसेवा केली आहे ती सर्वांच्या परिचयाची आहे. तरी या उभयतांसंबंधी ज्यांच्यापाशी आठवणी, पत्रे, वृतांत, चित्रे, परदेश-गमन इत्यादि साहित्य उपलब्ध असेल ते त्यांनी माझ्या खालील पत्यावर पाठविण्याची किंवा कळविण्याची व्यवस्था करावी अशी नम्र विनंती आहे. या बाबतींत कुणाला भेटावयाचे आवश्यक असल्यास तसेहि मला कळविण्याची कृपा करावी म्हणजे मी त्या व्यक्तींना भेटण्याचा प्रयत्न करीन. हे कार्य माझे एकटयाचे नसून सर्वांचेच आहे. तेव्हा मी सर्वांच्या साह्याची अपेक्षा करीत आहे या साह्याचा मी माझ्या ग्रंथात आवर्जून ऋणनिर्देश करीन. "––असे श्री. जगन्नाथ रामचंद्र जोशी, बुटी–वाडा, सितावर्डी, नागपूर–१, हे कळवितात.

★ ★ ★

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके		रु. पैसे
★ १ निबंध परिमल		२–२५
२ सुमन संचय		१–२५
+ ३ मराठी गद्य		१–५०
+ ४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे		२–००
५ भारती (नाटक) नाना जोग		१–५०
६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका–मालतीबाई श्रीखंडे		०–७५
७ कै. हरीभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह भाग २ रा		३–००
८ The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans-(पूर्ण ग्रंथ)ले. कै. डॉ. तु. ज. केदार		३–००
९ ,,	(केवळ भाग ४)	१–५०
१० डॉ. केदार यांचे चरित्र	—ले. ज. रा. जोशी	५–००
११ नाट्यमहोत्सव विशेषांक		३–००

कै. गडकरी वाङमयावरील प्रबंध

१२ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो. देशमुख	०–३१
१३ नाटककार गडकरी	—द. रा. गोमकाळे	०–३१
१४ गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	—कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
१५ गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१६ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	—द. वि. तेंडूलकर	०–५०
१७ गडकऱ्यांची खरी भूमिका	—प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१८ गडकऱ्यांची नाट्यशैली	—प्रा. रू. पा. पांजणकर	०–५०

१९ "युगवाणी" मासिक—वार्षिक वर्गणी रु. ५ (वि. सा. संघाचे मुखपत्र)

★ ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन यांचेकडे आहेत.

+ ह्या पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत.

बाकीची सर्व पुस्तके वि. सा. संघ' उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ या पत्त्यावर मिळतील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

नवीन सभासद होऊ इच्छिणारास सूचना

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६० पासून सुरू झाले असून नवीन वर्षाकरिता सभासद नोंदणी सुरू झाली आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठीभाषाप्रेमी व्यक्तीला सभासद होता येते. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावे लागते. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. ३ आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यात येतात. सभासदाचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पाच हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(आ) **आश्रयदाते**––एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(इ) **सहाय्यक**––पाचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(ई) **हितचिंतक**––अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(उ) **आजीव सभासद**––पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.

(ऊ) **साधारण सभासद**––वार्षिक तीन रुपये देणारे.

मराठी भाषेबद्दल प्रेम असणाऱ्या जास्तीत जास्त व्यक्तींनी सभासद व्हावे. आवेदनपत्र व वर्गणी केंद्रीय कार्यालयाकडे किंवा अधिकृत कार्यकर्त्याकडे जमा करावी व पावती घ्यावी ही विनंती.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

वर्धापनदिन दि. १४-१-१९६१, वर्ष ३८ वे

सर्व सभासदांना व इतर साहित्यप्रेमी लोकांना विनंती

३८ वर्षांपूर्वी मकरसंक्रमणाचे सुमुहूर्तावर विदर्भ साहित्य संघाची स्थापना झाली. अतएव यंदापासून मकरसंक्रमणाचे दिवशी म्हणजे १४ जानेवारीला केंद्र-स्थानी व सर्व शाखांचे ठिकाणी विदर्भ साहित्य संघाचा वर्धापनदिन साजरा करावयाचे ठरले आहे. ह्या निमित्ताने त्या त्या ठिकाणच्या सर्व सभासदांनी व अन्य साहित्यप्रेमी नागरिकांनी संमेलनाच्या स्वरूपात एकत्र यावे अशी अपेक्षा आहे.

नागपूर येथे केंद्रस्थानी दि. १४-१-१९६१ ला रात्री ८–३० वा. महाराष्ट्राचे **शिक्षणमंत्री श्री. बाळासाहेब** देसाई यांचे हस्ते वर्धापनदिन महोत्सवाचे उद्घाटन होईल व त्यानंतर लगेच '**संतवाणी**' नावाचा संगीत कार्यक्रम होईल.

दुसरे दिवशी म्हणजे दि. १५ जानेवारीला सकाळी **परिसंवाद**, दुपारी **प्रीतिभोजन**, संध्याकाळी **कविसंमेलन** व रात्री **नाट्यादि सांस्कृतिक कार्यक्रम** असे भरगच्च कार्यक्रम आयोजित केले आहेत.

ह्याच वेळी १९६० साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचे प्रदर्शनहि भरविण्यात येणार आहे. (सर्व लेखक, मुद्रक व प्रकाशक यांनी आपापल्या ग्रंथांची एकेक प्रत आमचेकडे पाठवावी अशी विनंती आहे.)

ह्याला जोडूनच दि. १६–१–६१ पर्यंत **कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमालेच्या** अंतर्गत सुप्रसिद्ध विद्वान **डॉ. ग. त्र्यं. देशपांडे** यांची "अभिनव गुप्ताचे प्राचीन भारतीय साहित्यशास्त्र" या विषयावर व्याख्याने होतील.

सहा दिवसांच्या ह्या कार्यक्रमासाठी किमान देणगी केवळ रु. ३ ठेवली आहे. तरी वि. सा. सं. च्या सर्व सभासदांनी व अन्य साहित्यप्रेमी नागरिकांनी आपली देणगी वि. सा. संघाच्या कार्यालयात किंवा अधिकृत कार्यकर्त्यांजवळ जमा करून ह्या कार्यक्रमात उत्साहाने भाग घ्यावा ही विनंती आहे.

ना. रा. शेंडे,	**श्री. गो. काशीकर,**	**य. गो. मालोदे,**
अध्यक्ष,	सरचिटणीस,	चिटणीस व आमंत्रक,
वि. सा. संघ.	वि. सा. संघ.	सां. का. समिति.

हे मासिक श्री. **पुरुषोत्तम दिवाकर ढवळे,** यांनी वि. सा. संघाकरिता प्रदीप मुद्रणालय, धरमपेठ, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ